1 4 JUN 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# देशी वाणांचे संवर्धन करणारी रोपवाटिका

## शिवाजी विद्यापीठात प्रयोग; फुले, फळे आणि वृक्षांची पाच हजार रोपे तयार

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १३ : शिवाजी विद्यापीठाच्या रोपवाटिकेत यंदा पाच हजार रोपे तयार आहेत. यात फुले, फळे याबरोबरच अन्य वृक्षांचा समावेश असून, विशेष म्हणजे यात बहुतांश रोपे ही देशी वाणांची आहेत. यात काही रोपे ही अशा वृक्षांची आहेत, जी पूर्वी सर्वत्र दिसत असत. मात्र, आता ठराविक भागातच आढळतात. अशा देशी वाणांच्या संवर्धनाचा यशस्वी प्रयोग विद्यापीठाच्या रोपवाटिकेत केला गेला आहे.

पावसाळा आला की सर्वत्र वृक्षारोपण उपक्रमांचे आयोजन केले जाते. यामुळे उजाड माळ, डोंगर छोट्या रोपांमुळे अंकुरल्यासारखे भासतात. गेल्या काही वर्षांत वृक्षारोपणाच्या उपक्रमांची संख्या वाढली आहे. मात्र, यात सर्रास परदेशी जातीची रोपे लावली जातात. त्यामुळे स्थानिक पातळीवर जैवविविधतेला धोका निर्माण होत आहे. अनेकदा कोणत्या प्रजातींची झाडे लावायची, याची माहिती नसते; तर बऱ्याचदा देशी वाण उपलब्ध होत नाही. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाच्या रोपवाटिकेत देशी प्रजातींच्या रोपांची लागवड केली गेली आहे. यात देशी गुलाब, सदाफुली, कामिनी, मोगरा, चाफा यांसारख्या फुलांची रोपे येथे आहेत. तसेच करंज, चिंच, जांभूळ, आंबा (देशी), हादगा, बहावा, कडुलिंब, सागवान, वड, पिंपळ, कांचन यांसारख्या वृक्षांची रोपेही करण्यात आली आहेत. सध्या पाच हजार रोपे येथे उपलब्ध आहेत.



### देशी वृक्षांची लागवड

शिवाजी विद्यापीठाचा परिसर हा ८५३ एकर इतका आहे. विद्यापीठात दरवर्षी वृक्षारोपण करण्यात येते. यासाठी देशी वृक्षांची निवड केली जाते. यंदा विद्यापीठात सागवान, कडुलिंब यांची ८०० रोपे लावण्यात आली आहेत. विशेष म्हणजे ही रोपे केवळ पावसाच्या पाण्यावर वाढविण्यात आली असून, त्यामुळे उजाड परिसर हिरवागार झाला आहे.

**पक्षी देशी वृक्षांवर घरटी करतात. त्यांची फळे पक्ष्यांसाठी उपयुक्त ठरतात. या वृक्षांच्या अवतीभोवती मोठ्या प्रमाणात विविध प्रकारचे किटक असतात. या सर्व जैवविविधतेच्या संवर्धनासाठी वृक्षांच्या स्थानिक प्रजाती लावणे आवश्यक आहे. यासाठीच विद्यापीठाच्या रोपवाटिकेत देशी वाणांची रोपे करण्यावर भर दिला गेला आहे.**

\- प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे, उपकुलसचिव